# रॉंग नंबर

बेल वाजली, दार उघडताच आंब्याची पेटी घेऊन आलेला इसम आतच आला आणि ठेवत म्हणाला,'साहेब ही आंब्याची पेटी तुम्हाला'! मी विचारलं.'अहो,आम्ही पेटी मागवलेली नाहीय, त्यावर तो म्हणाला ही पेटी तुमच्यासाठी भेट म्हणून आणलीय आणि अशीच पेटी आजच्या दिवशी दरवर्षी येईल माझ्याकडून.मी जिवंत असे पर्यत' हे त्यानं सांगताच मी त्याला म्हणालो. माझा काय संबंध? तुम्ही मला कशासाठी देताय हे, मी कोणाकडून असं काही घेत नाही.माझ्या नियमात बसत नाही ते,आजवरच्या ३४ वर्षाच्या नोकरीच्या काळात कुणाकडुन सुतळीचा तोडा देखिल कधी घेतला नाहीय, तुम्ही ती पेटी उचला आणि बाहेर व्हा...चला नाहीतर मला वेगळा मार्ग निवडावा लागेल, त्यावर तो अनोळखी इसम म्हणाला.'साहेब मी काय सांगतो ते ऐका मग तुम्ही मला जा म्हणून सांगीतलं तर मी पेटी घेउन निघून जाइन,आधी मला जरा पाणी द्याल का?.. मी आत हिला हाक मारून पाणी आणायला सांगितलं.त्याला बसायला सांगीतलं.

आधी मी तुमची क्षमा मागतो. मी तुमच्या फोन नंबर वरुन तुमचं नांव आणि पत्ता मिळवलाय. मला माहीत नव्हतं तुम्ही मोठ्ठे सरकारी अधिकारी आहात तो खाली पहातच म्हणाला. आता मात्र मला थोडा राग आला होता तो आवरून मी म्हणालो.फटाफट सांगा, तुम्ही कोण ? माझ्या फोन नंबरवरून नांव, पत्ता शोधून का आलात ? आणि ही आंब्याची पेटी, काय भानगड आहे तेवढ्यात ही सरबत घेउन आली मी म्हणालो थांबा हे घ्या सरबत अीण बोला' हिनं त्याला सरबत दिलं. त्यांनी सरबत घटाघटा पिऊन ग्लास खाली ठेवला आणि तो बोलु लागला,मी भानुदास देसाई,इथं मुंबईतच राहतो, ही माझ्या कोकणातल्या बागेतली या सिझनची पहिलीच काढलेली पेटी, कारण माझ्या आयुष्यात कलाटणी देणारे तुम्ही आहात म्हणून ही माझ्याकडून तुम्हाला भेट, आता भेट का म्हणून विचाराल तर त्याला एक मोठ्ठी स्टोरी आहे. वहिनी तुम्हीपण बसा आणि ऐका. भानुदास म्हणाला. भानुदासची स्टोरी ऐकायला मी पण आतूर झालो होतो.

मी १२-१५ वर्षांपूर्वी कोकणातून मुंबईला आलो. कोकणात आंब्याची बाग होती आमची ती मी पहायचो,पण त्यात म्हणावा तसा फायदा होइना, म्हणून बाग दुसरयाला करायला देऊन मी मुंबई गाठली होती. माझ्या भावाचं इथं जनरल स्टोअर्स होतं. त्याला धंद्यात मदत करावी आणी आपणही काही उद्योग करावा म्हणुन मुंबईला आलो. गणपती सिझनला गणपती विकायचो. दिवाळीला फटाके, पतंग, लाईटचं साहित्य, प्लंबींग मटेरियल विक्री अगदी सगळं सगळं करायचो. असा कोणता धंदा केला नाही असं नाही आणि काही यायचं नाही असं नाही, माझ्याकडे पदवी किंवा क्वालिफिकेश नव्हतं त्यामुळं ज्ञानाच्या आधारे कुठं नोकरी मिळेल अशी परिस्थिती नव्हती. पण छान चाललं होतं. चांगला प्रॉफिट मिळवायचो. मग ग्रेसरीचा आणि स्टेशनरीचा होलसेल धंदा करायला लागलो, मुंबईतल्या बऱ्याच मॉलना,दुकानांना माल पुरवायचो. तेही छान चाललं होतं.दरम्यान एक चांगली, साधीसुधी कोकणातलीच मुलगी प्रभा सांगून आली, तिच्यासोबत लग्न झालं आणि वर्षभरातच, माझ्या मुलीनं भाग्यश्रीनं आमच्या संसारात प्रवेश केला. आता आमच्या गरजा वाढल्या होत्या. माझा सध्याचा होलसेल व्यवसाय चांगला चालत होता, माझा धंद्याचा कॉन्फिडन्सपण वाढला होता. आणखी काहीतरी हवं, खूप

पैसा मिळवायला हवा, नवीन जागा हवी, असं काहीतरी डोक्यात चालू होतं आणि तेवढ्यात कुर्ल्यातला एक मॉल चालवायला देणार आहेत असं कळलं. घरी भावाशी विचार विनिमय केला. भाऊ बोलला, तुझ्या जबाबदारीवर कर, मला काही ते झेपणार नाही. माझं दुकान बरं आणि मी बरा. प्रभाशी बोललो तर ती म्हणाली, बघा आपल्याला जमणार का? भांडवल कुठून आणायचं? पैसा कसा उभा राहणार? एवढा स्टाफ परवडणार का?काय करताय ते जपुन करा, पण तोपर्यंत मिळालेल्या यशानं मी हुरळून गेलो होतो. आजपर्यंत कधी मोठा फटका बसला नव्हता आणि काहीही करायचा अनुभव होताच. साहेब, अहो प्लंबिंग, लाईट फिटींग, कलरींग पासून सगळं सगळं करायचो मी. ऑर्डर आली तर केटरींग कॉन्ट्रॅक्टसुध्दा घेतली होती. थोडे पैसे गाठीला होते त्यामुळं मी हे धाडस करायचं ठरवलं. माझं माझ्या मोठ्या दुकानाचं स्वप्न पूर्ण होणार होतं. पण हा घास खूपच मोठा होता. मॉल मालकांना भेटलो. मॉल चालवायला द्यायचा नव्हता तर त्यांना विकायचा होता. फक्त ५० टक्के किंमतीत उरलेला,माल,फर्निचर आणि सगळा सेटअप सगळं मिळतोय म्हणल्यावर मी इरेलाच पडलो. सगळी पुंजी काढली. बँकेचं लोन काढलं, गावाकडच्या आंब्याच्या बागेवर कर्ज काढूनसुध्दा जवळपास २५–३० लाख खाजगीतून आणले आणि मुहूर्तावर मॉल सुरु केला. आतापर्यंत छोट्या डबक्यात पोहणारा मी समुद्रात उडी घेतली होती. मॉल बरा चालत होता पण अपेक्षेप्रमाणे गिऱ्हाईक नव्हतं. पहिला माल विकून दुसरा माल आला. पण ६–१० महिन्यात माझा भ्रमनिरास झाला आणि हा त्या मालकांनं मॉल का विकायला काढला ते समजायला लागलं. मालाची चोरी, माल खरेदी करताना नोकर कमिशन खायचे. आडरस्त्याला असल्याने कस्टमर फार नव्हतेच शिवाय एक माणूस कुठं कुठं लक्ष ठेवणार. मुलगी लहान असल्यामुळं बायकोसुध्दा मदतीला येऊ शकत नव्हती. हळुहळू डबघाईला आलो. दारात सप्लायर यायला लागले. दिलेले चेक बाऊन्स झाल्यावर नवा माल यायचा बंद झाला. पगार होत नाहीत म्हणल्यावर स्टाफ पगारापोटी माल न्यायला लागला आणि दुकानात माल नाही म्हणून कस्टमर पण कमी व्हायला लागले. दुष्टचक्र सुरु झालं. हप्ते थकले तशी बँकेची नोटीस आली. कर्जाचे हप्ते थकलेत काय कराताय? फेडणं शक्य नाही हे लक्षात येताच मी बँकेसमोर शरणागती पत्करली. बँकेनं मॉलला टाळं लावलं. पण खाजगी आणलेल्या पैशावर व्याज सावकारीनं वाढायला लागलं.मग याचे पैसे त्याला, त्याचे याला, असं करत मीच सगळी दारं बंद केली,कुणाकडे जायची सोय राहीली नाही. साहेब, माणसानं ४ पैसे कमी मिळवावेत पण कर्जबाजारी होऊ नये बघा. मध्येच पाणी पिऊन भानुदास पुढे बोलू लागला. तुम्हाला वाटेल हे सगळं हा माणूस मला का सांगतोय? तर तुमचा फार मोठा संबंध आहे यात, म्हणून ऐकाच. साहेब, एक दिवस अघटीत घडलं. पैसे ज्याच्याकडून घेतले तो सावकार म्हणाला 'तुझ्याकडून असे काही पैसे फेडणं जमणार नाही तर मग दुसरा काही मार्ग पाहूया का? वहिनी जर काम काम करणार असतील त्यांना पाठवून द्या माझ्याकडं. मी घेतो पैसे फेडून.' साहेब, त्यातला गर्भीत अर्थ ओळखून मी त्याच्या कानाखाली वाजवली आणि हाकलून दिला. अपमानीत झालेला तो सावकार बघून घेतो म्हणून निघून गेला. आता पोलीस येतील वसूलीला अशी धमकी देउन गेला.डोकं फीरायची वेळ आली.
या मानसिक परिस्थितीत माझं नेहमीचं काम सुध्दा बंद पडलं होतं. हजारदा वाटायचं पूर्वीचं आयुष्य किती छान होतं. सगळं संपलं होतं. देणेकऱ्यांना चुकवण्या साठी घरातून सकाळी लवकर

बाहेर पडायचो आणि लोकांना,बँकांना चुकवत रात्री उशीरा घरी यायचो.भावाच्या मदतीवर किमान खायला प्यायला होतं. पण त्याचीही बायको आता टोचून बोलायला लागली होती, ते आम्हाला सहन व्हायचं नाही पण करणार काय? काहीतरी करायला हवं होतं पण सगळी दारं बंद झाली होती. पण सगळंच होतं नव्हतं ते संपवुन बसलो होतो.
रोज सीफेसला बसुन विचार करत दिवस काढायचो काय करावं?असं कीती दिवस मी पळणार होतो, कधीतरी कुणाला तरी सापडणारच होतो.देणेकरी आता घरी यायला लागले होते,आता माझ्यासमोर एकच सोपा पर्याय होता, स्वतःला संपवणं. पण लगेच विचार यायचा बायको, मुलीचं काय? पुढं त्या काय करणार ? माझ्याशिवाय त्या कशा राहणार ? त्यांना पण त्यांचं आयुष्य माझ्यासोबतच संपवावं लागणार होतं तरच आमची सगळ्यांची सुटका होणार होती.
त्या दिवशी त्या सावकाराचा फोन आला होता. उद्या गुंड घेऊन येतोय पैसे तयार ठेव नाहीतर तुला उचलणार,मग मी खूप विचार करून मनाचा हिय्या केला आणि मग मी सगळंच संपवायचा निर्णय घेतला. त्या दिवशी भाग्यश्रीचा वाढदिवस होता. मी केक घेतला. आंब्यावर मारायचं किटकनाशक घेतलं. आम्ही ते किटकनाशक आंबा एक्सपोर्टसाठी वापरायचो,रंगहीन, चवहीन, वासहीन. ते केकमध्ये घालायचं. तिघांनी केक खाल्ला की सगळंच समाप्त.मी घरी आलो तेंव्हा त्या दोघी वाट बघत बसल्या होत्या. ‘बाबा काय आणलंय म्हणून भाग्यश्री बिलगली’ मला गलबललं. पण उद्या सकाळी येणाऱ्या प्रसंगाला तोंड द्यायची माझी तयारी नव्हती. काही वेळातच आपण तिघेही नसणार. प्रभा म्हणाली, ‘अहो, केक कापायचा ना? आणलात बरं झालं ! बोलवायचं का काकाकाकूला ?’ मी नको म्हणून सांगितलं. आपण तिघेच, बाकी कोण नको. आपली परिस्थिती नाहीये की सध्या कुठला आनंद साजरा करू शकतो. प्रभा म्हणाली बरं ठिक आहे. कधी कापूया ते सांगा तुम्ही. फार विचार करू नका. हे पण दिवस जातील हो. माझ्या मूर्खपणामुळं आम्ही देशोधडीला लागलो होतो तरी त्या माझ्यावर अतुट विश्वास असणाऱ्या माझ्या बायकोची मला कीव आली. त्यांचा काही दोष नसताना त्यांना मी मारणार होतो. २ खून पण माझ्यानंतर ती साधीसुधी बाई या जगाला तोंड देऊ शकणार नव्हती. रोज मरण आलं असतं त्यांना. त्यासाठीच आम्ही तिघांनी या जगाचा निरोप घेणं गरजेचं होतं. माझा निश्चय पक्का होता. मी केकमध्ये बाटलीतलं द्रव्य ओतलं. ५ मिनिटांत ते पसरणार होतं. १० मिनिटात केक खाऊन आम्ही जीवन संपवणार होतो आणि तेवढ्यात साहेब माझ्या या स्टोरीत तुमची एन्ट्री झाली.

मी दोघींना केक कापायला हाक मारणार तेवढ्यात माझा फोन वाजला. मी मरणाची मानसिक तयारी करत होतो. फोन मी उचलणार नव्हतो, पण तो तसाच वाजत राहिला, वाजतच राहिला. शेवटी वैतागून मी उचलला आणि तुम्ही फोनवर होतात. मी काही बोलायच्या आत तिकडून ओरडलात, ‘तुला संधी किती द्यायची? आता तरी ही संधी सोडू नको. मुंबईतले मोठे बिल्डर हिरानंदानी एक मोठी स्किम करतायत सायनला. त्यांना चांगला प्लंबर हवाय त्यांना सांग माधवरावांनी पाठवलं आहे आणि त्यांच्याकडं जा. बरीच मोठ्ठी स्कीम आहे. ही शेवटची संधी आहे असं समज. मी असल्या ओळखी कधी वापरत नाही पण तुझ्यासाठी बोललोय पुन्हा कोणाला फोन करणार नाही,याला काम द्या म्हणून. आणि अहो मी रॉग नंबर म्हणायच्या आत तूम्ही फोन कट देखिल केलात.

साहेब, देव खरंच असतो हो, आणि तो असा कधीतरी प्रगट होतो का? मी विचार करायला लागलो. खरंच सगळं संपलंय का ? इतकं सगळं संपलंय का? मी पूर्वी बिल्डींग लाईनमधलं सगळी कामं केली होती.तुम्ही संधी कुणाला दिली होती माहीत नाही पण मी दुसऱ्या दिवशी ही शेवटची संधी घ्यायचं ठरवलं.ती जर मिळाली नसती तर औषधं होतचं मी त्या सावकारां कडुन गोड बोलून काही दिवसांची मुदत मागुन घेतली.

हिरानंदानी बिल्डर ... मोठं नांव. मी साइटचा पत्ता काढून तिथं पोहोचलो आणि तिथं माधवराव हे नांव म्हणजे जादूची किल्ली ठरलं. मला डायरेक्ट हेड समोर जायला मिळालं. त्या स्किमच्या प्लंबींगचं, कामं करायला योग्य माणूस हवा होता,प्रचंड काम होतं आणी ते मला मला मिळालं.लगेच काम सुरु करायचं होतं. हे माधवराव कोण होते ? मला का फोन आला होता हे कळलं नाही आणि मी ही पुन्हा उलटा फोन करून तुम्हाला कळवायचाही विचार केला नाही. कदाचित तो मी नव्हे म्हणून काम गेलं तर मला परवडणार नव्हतं. मी गुपचूप काम सुरु केलं.कंपनीला पण कामाशी मतलब होता.हळूहळू लाईट फीटींग आणि कलरचं काम सुध्धा मिळवलं.

माझ्यातला खचलेला भानुदास उभा राहिला. दिवसरात्र काम करुन कर्ज फेडली. २ वर्षात मॉल विकला,यावर्षी बाग सोडवली आणि बाग सोडवताच पहिली काढलेली आंब्याची पेटी साहेब तुमच्यासाठी आणलीये. साहेब तुम्ही माझ्यासाठी देव आहात,आणी आमच्यात पहिल्या पेटीचा नैवेद्य देवाला दाखवतात.म्हणून ही पेटी तुम्हाला.आज आमच्या भाग्यश्रीचा वाढदिवस आहे, या पुढं आमच्या भाग्यश्रीच्या दर वाढदिवसाला आमच्या बागेतली पहिली पेटी मी घेऊन येणार आहे तुमच्यासाठी. मला माफ करा, मी तुम्हाला फसवलं पण साहेब तुम्ही तीन जीव वाचवलेत. तुमच्या एका फोननं माझं आयुष्य पालटलं......आता माझ्या डोक्यात प्रकाश पडायला लागला. २ वर्षापूर्वीचा तो दिवस आठवला. हिरानंदानी माझा खास मित्र,हिरानंदानीला फोन मी सदानंदसाठी केला होता आणि सदानंद नेहमीप्रमाणे तिकडे काम मागायला जाणार नाही हे माहित असल्यानं, मी फॉलोअप पण घेतला नव्हता. कधीतरी भेटल्यावर फक्त बोलता बोलता हिरानंदानी बोलला होता, काय भारी माणूस दिलाय माधवराव तुम्ही. मला वाटलं तो चेष्टा करतोय म्हणून मी पण फार खोलात पडलो नव्हतो. पण ठीक आहे, भानुदास छान झालं. अरे माझ्या हातून हे अभावितपणे घडलं. त्यानं विचारल साहेब हा सदानंद कोण ? मी त्याची नोकरी हिरावुन घेतली. मी म्हणालो 'अरे सदानंद म्हणजे आमच्या बाईसाहेबांचे बंधू. त्यांना नोकरीची गरज होती म्हणून मी हिरानंदानीला शब्द टाकला होता.मला माहीत होतं तो जाणार नाही,तो गेला नाही पण माझ्या हातुन नकळत सत्कर्म घडलं. सौ म्हणाल्या, 'अहो पण मी त्यादिवशी तुमच्याशी भांडले होते म्हणून हे सगळं घडलं.' 'ते कसं काय ? मी बुचकळ्यात पडलो. ' मी भांडले म्हणून तुम्ही रागारागानं चुकीचा नंबर डायल केला आणि रागारागानं कुणाशी बोलतोय हे न ऐकताच बोलून फोन बंद केलात आता बोला? मी हात जोडले आणी म्हणालो'खरं आहे बाईसाहेब, हे सगळं जगच तुमच्यामुळं चाललंय आणि भानुदास तुझ्या आयुष्यातला हा टर्निंग पॉईंट या देवामुळं नाही तर या देवीच्या

आशीर्वादाने आला. म्हणून हा नैवेद्य मला नको या देवीला दाखव. बाईसाहेब, झालं का समाधान? आणि आम्ही सारेच एका समाधानानं हसलो.आयुष्यात पहील्याच असं कुणाकडून काही घेतलं होतं.

उदय गोडबोले. ४-४-२०१७